# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक २१.०४.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दिनांक २०.०४.२०२६ रोजी अवैध दारुविक्री करणा—यांविरुध्द धडक मोहीम. तसेच, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २०.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, अवैध दारुविक्री करणारे इसमांविरुध्द विशेष मोहीम राबवली. सदर मोहीमेमध्ये अवैध दारुविक्री करणारे इसम, आस्थापना, ओपन रुफटॉप हॉटेल्स चेक करण्यात आले व चेकींगदरम्यान कारवाई करुन २५ केसेसमध्ये २५ ईसमांवर धडक कारवाई करून एकूण ५३,०२५/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. सदर मोहीमेदरम्यान हद्यपार आरोपी, जेल रिलीज आरोपी व हत्यार कायदयातील आरोपींना चेक करण्यात आले.

तसेच, एन.डी.पी.एस. कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०३ इसमांवर कारवाई करून एकुण ४८,७०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०२ ईसमांवर कारवाई करून एकुण १२,६६५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,०४५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,७६,७००/—रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आली असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे सोनेगाव :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी कोल्लुविरा व्यंकटा फनिंद्रकुमार वय २७ वर्षे रा. ओल्ड राजराजेश्वरी, विजयवाडा, आंध्रप्रदेश हे त्यांचे मोबाईलवर क्रिकेट संबंधाने व्हिडीयो बघत असतांना त्यांनी आरोपी काजी झिशान अहमद रा. अनंतनगर, काटोल रोड, गिट्टीखदान, नागपूर यांचे इंस्टाग्रामवरील व्हिडीयो बघितले. फिर्यादी यांनी त्याचेबाबत माहिती काढली असता, आरोपी हा डी.वाय. पाटील स्पोर्ट अकॅडेमी, मिहान नागपूर येथे कोच असल्याचे माहिती झाले. दिनांक ०८.११.२०२३ ते ०६.१०.२०२४ चे दरम्यान फिर्यादी यांनी आरोपी याची पोलीस ठाणे सोनेगाव हद्यीत डी.वाय. पाटील स्पोर्ट अकॅडेमी, खापरी, मिहान नागपूर येथे भेट घेतली. आरोपी याने फिर्यादीस विश्वासात घेऊन त्यास रणजी क्रिकेट ट्राफीमध्ये खेळण्याची संधी देण्याचे आमिष दाखविले. त्याकरीता आरोपी याने फिर्यादीकडून वेगवेगळया खात्यांमध्ये वेळोवेळी एकूण रक्कम २०,०२,०००/— रु. भरण्यास भाग पाडले. फिर्यादी यांनी आरोपीस खेळण्याची संधीबाबत विचारणा केली असता, आरोपीने नेहमी टाळाटाळ केली तसेच फिर्यादी यांची रक्कम परत न करता फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन फिर्यादीची फसवणूक केली.

यात्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सोनेगाव येथे पोउपनि. चंद्रशेखर घारपुरे ९९२३४०९३०३ यांनी आरोपींविरूध्द कलम ३१६(२),३१८(४) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे मानकापूर :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २०.०४.२०२६ चे १५.०० वा. चे सुमारास, फिर्यादी डॉ. संदीप नत्थुजी अप्पा वय ४६ वर्षे, रा. प्लॉट क्र. ३८, बाबा फरीद नगर, झिंगाबाई टाकळी, नागपूर हे पोलीस ठाणे मानकापूर हद्दीत, महालक्ष्मी प्लायवूड समोरील रोड, झिंगाबाई टाकळी येथून त्यांचे मोटारसायकल क्र. एमएच ०५ बीएफ ७३९३ ने घरी जात असतांना, चारचाकी वॅगनआर कार क्र. एमएच. ४० बीजे ५२०६ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व धोकादायकरित्या रस्त्याचे मधोमध उभे करुन चालक साईडचे दार अचानक उघडल्याने फिर्यादी कारचे दाराला धडकून गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता चांडक हॉस्पिटल येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे.

यात्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या बयाणावरुन पोलीस ठाणे मानकापूर येथे मपोउपनि. प्रांजली आंबेडकर ९०६७६६५६२६ यांनी आरोपी कार चालकाविरूध्द कलम २८१,१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे बेलतरोडी :—** दिनांक २०.०४.२०२६ चे २१.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, प्लॉट क्र. १०, बेसा रोड, हॉटेल मेजवानीचे बाजुला, पटेल यांचे बंगल्यासमोर, कंपाऊंडलगत एक अनोळखी इसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयाचे, वर्णन—रंग गोरा, बांधा सडपातळ, अंगात— लाल निळया पांढरे रंगाचे फुलबाहीचा शर्ट व काळया रंगाचा फुलपॅन्ट, हातात गोल्डन रंगाची घडयाळ व काळया फ्रेमचा चष्मा घातलेले, बेशुध्द अवस्थेत मिळून आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मृतक यांची अद्याप ओळख पटलेली नाही.

यात्रकरणी फिर्यादी अभिषेक राधेश्याम धुर्वे वय २६ वर्षे रा. महाशक्ती ट्रेडर्स, प्लॉट क्र. १०, भुपेश पटेल यांचा बंगला, बेसा रोड, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. रविकांत भदाणे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे सिताबर्डी:—** कु. दिपांशी महेश सेन वय २० वर्षे, रा. अग्रवाल बिछायत केंद्र मागे, किर्तन गल्ली, सिताबर्डी, नागपूर ही दिनांक १३.०४.२०२६ चे १५.०० वा. चे पासून पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीतील राहते घरुन टयुशनला गेली असता, आजपावेतो परत आली नाही, बेपत्ता आहे. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांब, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट, केस— काळे लांब, अंगात— हिरव्या रंगाची कुर्ती व पांढरी लेगीन घातलेली आहे. ती हिंदी भाषा बोलते. सोबत मोबाइल आहे.

**२) पोलीस ठाणे सिताबर्डी:—** रामक्रिष्ण प्यारेलाल वर्मा वय २६ वर्षे रा. चौराई, वार्ड क्र. ९, जि. छिंदवाडा, मध्यप्रदेश हे दिनांक १४.०४.२०२६ चे १६.०० वा. चे पासून पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीतील एमपी बसस्टॅन्ड येथून बेपत्ता झाला आहे. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे, अंगात— ग्रे रंगाचा शर्ट व पांढरा फुलपॅन्ट घातलेला आहे. तो हिंदी भाषा बोलतो.



कु. दिपांशी



रामक्रिष्ण

स्वा/—

( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.